मिरारोडचा महाराजा

स्थापना: १९९१ वर्ष: ३२ वे

**सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ**
**सेक्टर - ९**

# महाराजा आरती संग्राह



Follow us on :

MIRAROADCHA MAHARAJA

Official Website

www.miraroadchamaharaja.com

मिरारोडचा महाराजा

# श्री गणपतीची आरती

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची | नुरवी
पुरवी प्रेम कृपा जयाची ।। सर्वांगी सुंदर
उटी शेंदुराची कंठी झळके माळ मुक्ता
फळांची || १ ||

जयदेव जयदेव जय मंगलमुर्ती दर्शनमात्रे
मनः कामनापुर्ती || धृ ||

रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा ।
चंदनाची उटी कुंमकुमकेशरा हिरेजडीत
मुकट शोभतो बरा । रुणुझुणती नूपुरे
चरणी घागरिया ।। जयदेव ।। २ ।।

लंबोदर पितांबर फणिवरबंधना सरळ सोंड
वक्रतुंड त्रिनयना । दास रामाचा वाट पाहे
सदना । संकटी पावावें निर्वाणी रक्षावें
सुरवरवंदना

जयदेव जयदेव जय मंगलमुर्ती दर्शनमात्रे
मनः कामनापुर्ती ।। ३ ।।

Follow us on :
MIRAROADCHA MAHARAJA

Official Website
www.miraroadchamaharaja.com

मिरारोडचा महाराजा

# श्री गणपतीची आरती

शेंदुर लाल चढायो अच्छा गजमुखको
दोंदिल लाल विराजे सुत गौरीहरको
हाथलिये गुडलडडू साई सुरवरको महिमा
कहे न जाय लागत पदको
|| १ ||

जय जय जी गणराज विद्या सुखदाता।
धन्य तुम्हारो दर्शन मेरा मन रमता ।।धृ.।।

अष्टौ सिध्दी दासी संकटको वैरी ।।
विघ्नविनाशन मंगल मरत अधिकारी
कोटीसूरज प्रकाश ऐसी छबि तेरी
गडस्थलमदमस्तक झूले शशि बिहारी ||
जय || २ ||

भावभगतिसें कोई शरणागत आवे
संतति संपत्ति सबही भरपूर पावें
ऐसे तुम महाराज मोको अति भावे ।
गोसावीनंदन निशिदिन गुण गावे
।। जय ।।३।।

Follow us on :
MIRAROADCHA MAHARAJA

Official Website
www.miraroadchamaharaja.com

मिरारोडचा महाराजा

# श्री गणपतीची आरती

नानापरिमळ दूर्वा शेंदूर शमिपत्रे
लाडू मोदक अन्ने परिपूरित पायें ।
ऐसें पूजन केल्या बीजाक्षरमंत्रे ।
अष्टौ सिध्दी दासी नवनिधि देसी क्षणमात्रे
|| १ ||

जय देव जय देव जय मंगलमूर्ती
तुझे गुण वर्णाया मज कैची स्फूर्ती ।। धृ.।।

तुझे ध्यान निरंतर जे कोणी करिती।
त्यांची सकलहि पापे विघ्नेही हरती
बाजी वारण शिबिका सेवक सुत युवती।
सर्वहि पावती अंती भवसागर तरती
। । जय देव || २ ||

शरणांगत सर्वस्वें भजती तव चरणीं ।
कीर्ति तयांची राहे जोवर शशितरणी ।
त्रैलोक्यी ते विजयी अद्भुत हे करणीं
गोसावीनंदन रत नामस्मरणी
जय देव जय देव ।। ३ ।।

Follow us on :
MIRAROADCHA MAHARAJA

Official Website
www.miraroadchamaharaja.com

मिरारोडचा महाराजा

# श्रीं गणपतीची आरती

उंदरावरि बैसोनि दूडदूडा येसी।
हाती मोद्क लाडू घेउनियां खासी।
भक्तांचे संकटी धावूनि पावसी।
दास विनविती तुझियां चरणासी

जय देव जय देव जय गणराजा॥१॥
सकळ देवां आधी तूं देव माझा॥ जय
देव.॥धृ.॥

भाद्रपदमासी होसी तू भोळा।
आरक्त पुष्पांच्या घालूनिया माळा।
कपाळी लावूनी कस्तुरी टीळा।
तेणे तू दिससी सुंदर सांवळा॥
जय देव जय देव जय गणराजा॥२॥

प्रदोषाचे दिवशी चंद्र श्रापीला।
समयी देवे मोठा आकांत केला।
इंदु येवोनि चरणी लागला।
श्रीराम बहुत श्राप दिधला॥
जय देव जय देव जय गणराजा ॥३॥

पार्वतीच्या सुता तू ये गणनाथा।
नेत्र शिणले तुझी वाट पाहतां॥
किती अंत पाहासी बा विघ्नहर्ता।
मला बुद्धी देई तू गणनाथा॥
जय देव जय देव जय गणराजा ॥४॥

Follow us on :
MIRAROADCHA MAHARAJA

Official Website
www.miraroadchamaharaja.com

# श्री शंकराची आरती

लवथवती विक्राळ ब्रह्मांडी माळा ।
विषे कंठ काळा त्रिनेत्री ज्वाळा ।
लावण्य सुंदर मस्तकीं बाळा ।
तेंथुनिया जळ निर्मळ वाहे झुळझुळा ||

जयदेव जयदेव जय श्री शंकरा ।
आरती ओवाळिता तुज कर्पुरगौरा ||
जयदेव जयदेव ||धृ||

कर्पुरगौरा भोळा नयनी विशाळा अर्धांगी
पार्वती सुमनांच्या माळा ।
विभुतीचे उधळण शितिकंठ नीळा ।
ऐसा शंकर शोभे उमा वेल्हाळा
|| जयदेव ।। २ ।।

देवी दैत्यी सागरमंथन पै केले ।
त्यामाजी अवचित हळाहळ उठिले ।
तें त्वां असुरपणें प्राशन केले ।
निलकंठ नाम प्रसिध्द झाले ।। जयदेव ।।

व्याघ्राबर फणिवरधर सुंदर मदनारी ।
पंचानन मनमोहन मुनिजन सुखकारी ।
शतकोटीचे बीज वाचे उचारी ।
रघुकुळटिळक रामदासा अंतरी ।
।। जयदेव ||

Follow us on :
MIRAROADCHA MAHARAJA

Official Website
www.miraroadchamaharaja.com

मिरारोडचा महाराजा

# श्री देवीची आरती

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी ।
अनाथनाथे अंबे करुणा विस्तारी ||
बारी बारी जन्ममरणाते वारी ।
हारी पडलों आता संकट निवारी ।। १ ।।

जयदेवी जयदेवी जय महिषासुरमथिनी
सुरवरईश्वरवरदे तारक संजिवनी ।। धृ ।।

त्रिभुवनभुवनी पहतां तुज ऐसी नाही
चारी श्रमलो परंतु न बोलवे काही ।
साहीं विवाद करिता पडलो प्रवाही
ते तूं भक्तलागी पावसी लवलाही ।। जय ।।

प्रसन्नवदने प्रसन्न होसी निजदासां ।
क्लेशापासुनि सोडवी तोडी भावपाशा
अंबे तुजवांचुन कोण पुरविल आशा ।
नरहरि तल्लिन झाला पदपंकजलेशा ।।

जयदेवी जयदेवी जय महिषासुरमथिनी ।।
सुरवरईश्वरवरदे तारक संजिवनी ।। ३ ।।

Follow us on :
MIRAROADCHA MAHARAJA

Official Website
www.miraroadchamaharaja.com

मिरारोडचा महाराजा

# श्रीं विठोबाचे आरती

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा ।
वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा ॥
पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा ।
चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ॥

जय देव जय देव जय पांडुरंगा ।
रखुमाईवल्लभा, राईच्या वल्लभा पावे
जिवलगा ॥

तुळसीमाळा गळा कर ठेवुनि कटी ।
कासे पीतांबर कस्तुरी लल्लाटी ॥
देव सुरवर नित्य येती भेटी ।
गरुड हनुमंत पुढे उभे रहाती ॥

धन्य वेणुनाद अनुक्षेत्रपाळा ।
सुवर्णाची कमळे वनमाळा गळा ॥
राई-रखुमाबाई राणीया सकळा ।
ओवाळीती राजा विठोबा सावळा ॥

ओवाळू आरत्या कुरवंड्या येती ।
चंद्रभागेमाजी सोडुनिया देती ॥
दिंड्या पताका वैष्णव नाचती ।
पंढरीचा महिमा वर्णाचा किती ॥

आषाढी कार्तिकी भक्तजन येती ।
चंद्रभागेमध्ये स्नाने जे करिती ॥
दर्शनहेळामात्रे तया होय मुक्ती ।
केशवासी नामदेव भावे ओवाळीती ॥

जय देव जय देव जय पांडुरंगा ।
रखुमाईवल्लभा, राईच्या वल्लभा पावे
जिवलगा ॥

Follow us on :
MIRAROADCHA MAHARAJA

Official Website
www.miraroadchamaharaja.com

मिरारोडचा महाराजा

# श्री विठ्ठलाची आरती

येई हो विठ्ठले माझे माऊली ये ।। माझे
माऊली ये ।।
निढळावरी कर ठेऊनी बाट मी पाहे ।।धृ.।।

आलिया गेलिया हातीं धाडी निरोप |
पंढरपुरी आहे माझा मायबाप || येई.
।। १ ।।

पिवळा पीतांबर कैसा गगती
झळकला ।।
गरूडावरी बैसुन माझा कैवारी आला ।। येई.
।।२।।

विठोबांचे राज आम्हा नित्य दीपवाळी ।।
विष्णुदास नामाजीवेंभावे ओवाळी ।। येई हो
|| ३ ||

असो नसो भाव देवा तुझीया ठाया ।
कृपा दृष्टी पाहे माझ्या पंढरीराया । । येई .
।।४।।

Follow us on :
MIRAROADCHA MAHARAJA
Official Website
www.miraroadchamaharaja.com

मिरारोडचा महाराजा

# श्री दत्ताची आरती

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा ।
त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा
नेती नेती शब्द नये अनुमाना।
सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्यान
।। १ ।।

जयदेव जयदेव जय श्री गुरूदत्ता ।
आरती ओवाळता हरली भवचिंता ॥ धृ ।।

सबाह्य अभ्यंतरी तुं एक दत्त
अभाग्यासी कैची कळेल ही मात ।
पराहि परतली तेथे कैचा हेत
जन्ममरणाचाही पुरलासे अंत ।। जय ।।

दत्त येऊनिया उभा ठाकला ।
सद्भावे साष्टांगे प्रणिपात केला ।
प्रसन्न होऊनी आशिर्वाद दिधला ।
जन्म-मरणाचा फेरा चुकविला || जय || ३ | |

दत्त दत्त ऐसे लागलें धान्य ।
हरपले मन झाले उन्मन
मी तूंपणाची झाली बोळवण ।
एका जनार्दनी श्री दत्तधान्य
|| जयदेव जयदेव ||

Follow us on :
MIRAROADCHA MAHARAJA

Official Website
www.miraroadchamaharaja.com

# श्री आरती दशावताराची

आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रह्म ।।
भक्तसंकटी नाना स्वरूपीं स्थापिसी स्वधर्म।।धृ.।।

अंबऋषिकारणे गर्भवास सोशीसी ।
वेद नेले चोरूनि ब्रह्मा आणुनिया देसी ।।
मत्स्यरूपींनारायण सप्तहि सागर धुंडीसी।
हस्त लागतां शंखासुरा तुझा वर देसी । १ ।।

रसातळाशी जातां पृथ्वी पाठीवर घेसी ॥
परोपकारासाठी देवा कांसव झालासी ।।
दाढें धरूनीं पृथ्वी नेता वराहरूप होसी ।
प्रल्हादाकारणे स्तंभी नरहरि गुरगुरसी ।। २ ।।

पांचवे अवतारी बळिच्या द्वाराला जासी।।
भिक्षे स्थळ मागुनी बळिला पाताळी नेसी ।।
सर्व समर्पण केले म्हणनि प्रसन्न त्या होसी ।।
वामनरूपा धरूनी बळिच्याद्वारी तिष्ठसी ॥ ३ ॥

सहस्रार्जुन मातला जमदग्नीचा वध केला।।
कष्टीं ते रेणुका म्हणूनी सहस्रार्जुन वधिला ।
निःक्षत्री पृथ्वी दान दिधली विप्राला ।।
साहावा अवतार परशुराम प्रगटला ॥४॥

मातला रावण सर्वां उपद्रव केला ।।
तेहतीस कोटी देव बंदी हरलें सीतेला ।।
पितृवचनालग रामें बनवास केला।।
मिळोनी वानर सेना राजाराम प्रगटला ।। ५ ।।

देवकीवसुदेव बंदीमोचन त्वां केलें ।।
नंदाघरी जाऊन निजसुख गोकुळा दिधले ।।
गोरसचोरी करीतां नवलक्ष गोपाळ मिळविले ।।
गोपिकांचे प्रेम पाहुनी श्रीकृष्ण भुलले ।। ६ ।।

बौध्द कलंकी कलियुगि झाला अधर्म हा अवघा ।।
सांडुनि नित्यधर्म सोडुनि नंदाची सेवा ।।
म्लेंच्छंमर्दन करिसी म्हणूनी कलंकी केशवा ।।
बहिरवि जान्हवि द्यावी निजसुखानंदसेवा ।। ७ ।

Follow us on :
MIRAROADCHA MAHARAJA
Official Website
www.miraroadchamaharaja.com

मिरारोडचा
महाराजा

# आरती जय जगदीश हरे

ॐ जय जगदीश हरे,
स्वामी जय जगदीश हरे ।
भक्त जनों के संकट,
दास जनों के संकट,
क्षण में दूर करे ॥
॥ ॐ जय जगदीश हरे..॥

जो ध्यावे फल पावे,
दुःख बिनसे मन का,
स्वामी दुःख बिनसे मन का ।
सुख सम्पति घर आवे,
सुख सम्पति घर आवे,
कष्ट मिटे तन का ॥
॥ ॐ जय जगदीश हरे..॥

मात पिता तुम मेरे,
शरण गहूं किसकी,
स्वामी शरण गहूं मैं किसकी ।
तुम बिन और न दूजा,
तुम बिन और न दूजा,
आस करूं मैं जिसकी ॥
॥ ॐ जय जगदीश हरे..॥

तुम पूरण परमात्मा,
तुम अन्तर्यामी,
स्वामी तुम अन्तर्यामी ।
पारब्रह्म परमेश्वर,
पारब्रह्म परमेश्वर,
तुम सब के स्वामी ॥
॥ ॐ जय जगदीश हरे..॥

तुम करुणा के सागर,
तुम पालनकर्ता,
स्वामी तुम पालनकर्ता ।
मैं मूरख फलकामी,
मैं सेवक तुम स्वामी,
कृपा करो भर्ता॥
॥ ॐ जय जगदीश हरे..॥

विषय-विकार मिटाओ,
पाप हरो देवा,
स्वमी पाप हरो देवा ।
श्रद्धा भक्ति बढ़ाओ,
श्रद्धा भक्ति बढ़ाओ,
सन्तन की सेवा ॥

Follow us on :
MIRAROADCHA MAHARAJA

Official Website
www.miraroadchamaharaja.com

मिरारोडचा महाराजा

# आरती श्री साईबाबांची

आरती साईबाबा |
सौख्यदातार जीवा। चरणरजातली ।
द्यावा दासा विसावा, भक्ता विसावा ।।
आ०।।ध्रु ०।।

जाळुनियां अनंग। स्वस्वरूपी राहेदंग ।
मुमुक्षूजनां दावी । निज डोळा श्रीरंग ।।
आ०।। १ ।।

जयामनी जैसा भाव । तया तैसा अनुभव ।
दाविसी दयाघना । ऐसी तुझीही माव ।।
आ०।। २ ।।

तुमचे नाम ध्याता । हरे संस्कृती व्यथा ।
अगाध तव करणी । मार्ग दाविसी अनाथा
।। आ०।। ३ ।।

कलियुगी अवतार । सगुण परब्रह्मः साचार ।
अवतीर्ण झालासे । स्वामी दत्त दिगंबर ।।
द०।। आ०।। ४ ।।

आठा दिवसा गुरुवारी । भक्त करिती वारी ।
प्रभुपद पहावया । भवभय निवारी ।।
आ०।। ५ ।।

माझा निजद्रव्यठेवा । तव चरणरज सेवा ।
मागणे हेचि आता । तुम्हा देवाधिदेवा ।।
आ०।। ६ ।।

इच्छित दिन चातक। निर्मल तोय निजसुख ।
पाजावे माधवा या । सांभाळ आपुली भाक
।। आ०।। ७ ।।

Follow us on :
MIRAROADCHA MAHARAJA
Official Website
www.miraroadchamaharaja.com

मिरारोडचा महाराजा

# आरती श्री साईबाबांची

ओवाळूं आरती माझ्या सद्‌गुरूनाथा,
साईनाथा ।।
पांचांही तत्वांचा दीप लाविला आतां ।।

निर्गुणाची स्थिति कैसी आकारा आली ।।
सर्वां घटी भरूनि उरली साई माऊली ।।
ओंवाळू ।। १ ।।

रज तम सत्य तिघे माया प्रसवली ।।
माथेचिय पोटी कैसी माया उद्‌वली ।।
ओवाळूं ।। २ ।।

सप्तसागरी कैसा खेळ मांडीला ।।
खेळूनियां खेळ अवधा विस्तार केला ।।
ओंवाळूं ।। ३ ।।

ब्रह्मांडींची रचना दाखविली डोळां ।।
तुका म्हणे माझा स्वामी कृपाळू भोळा ।।
सद्‌गुरू (साई सद्‌गुरू) भोळा ।।
ओवाळूं ॥४॥

Follow us on :
MIRAROADCHA MAHARAJA

Official Website
www.miraroadchamaharaja.com

मिरारोडचा महाराजा

# आरती श्री ज्ञानेश्वराची

आरती ज्ञानराजा ।
महाकैवल्यतेजा । कैवल्यतेजा
।
सेविती साधुसंत ।
मनु वेधला माझा ।
वेधला माझा |
आरती ज्ञानराजा ।

लोपलें ज्ञान जगीं ।
हित नेणती कोणी ।
नेणती कोणी ।
अवतार पांडुरंग ।
नाम ठेविले ज्ञानी ।
ठेविले ज्ञानी ।

आरती ज्ञानराजा ।
महाकैवल्यतेजा ।
सेविती साधुसंत ।
मनु वेधला माझा ।
वेधला माझा ।
आरती ज्ञानराजा ।

कनकाचे ताट करीं ।
उभ्या गोपिका नारी ।
गोपिका नारी ।
नारद तुंबरही ।
साम गायन करी ।
गायन करी ।
आरती ज्ञानराजा ।

प्रगट गुह्य बोले ।
विश्व ब्रह्मचि केलें ।
ब्रह्मचि केलें ।
रामाजनार्दनीं ।
चरणीं मस्तक ठेविलें ।
आरती ज्ञानराजा ।

आरती ज्ञानराजा ।
महाकैवल्यतेजा ।
सेविती साधुसंत ।
मनु वेधला माझा ।
वेधला माझा ।
आरती ज्ञानराजा

Follow us on :
MIRAROADCHA MAHARAJA
Official Website
www.miraroadchamaharaja.com

मिरारोडचा महाराजा

# श्री तुकारामाची आरती

आरती तुकारामा |
स्वामी सद्गुरुधामा ||
सच्चिदानंद मूर्ती |
पाय दाखवी आम्हा ||
आरती तुकारामा ||धृ||

राघवे सागरात |
पाषाण तारीले ||
तैसे हे तुकोबाचे |
अभंग उदकी रक्षिले
उदकी रक्षिले ||
आरती तुकारामा ||धृ||

तुकिता तुलनेसी |
ब्रह्म तुकासी आले ||
म्हणोनि रामेश्वरे |
चरणी मस्तक ठेविले
मस्तक ठेविले ||
आरती तुकारामा ||धृ||

स्वामी सद्गुरुधामा |
सच्चिदानंद मूर्ती ||
पाय दाखवी आम्हा |
दाखवी आम्हा ||
आरती तुकारामा ||धृ||

Follow us on :
MIRAROADCHA MAHARAJA

Official Website
www.miraroadchamaharaja.com

मिरारोडचा महाराजा

# निरोप आरती

जाहले भजन आम्ही नमितो तव चरण ।
वारुनिया विघ्ने देवा रक्षावे दीना ॥धृ॥

दास तुझे आम्ही देवा तुजलाची ध्यातो
प्रेमे करुनिया देवा गुण तुझेची गातो ॥१॥

तरी द्यावी सिद्धी देवा हेची वासना, देवा हेची वासना
रक्षुनियां सर्वां द्यावी आम्हासी आज्ञा ॥२॥

मागणे ते देवा एकची आहे आता एकची आहे
तारुनियां सकळां आम्हां कृपादृष्टी पाहे ॥३॥

जेव्हां सर्व आम्ही मिळूं ऐशा या ठाया ऐशा या ठाया
प्रेमानंदे लागू तुझी कीर्ति गावया ॥४॥

सदा ऐशी भक्ति राहो आमुच्या मनी देवा आमुच्या मनी
हेची देवा तुम्हा असे नित्य विनवणी ॥५॥

वारुनिया संकटे आता आमुची सारी आता आमुची सारी
कृपेची साऊली देवा दीनावरि करी ॥६॥

निरंतर आमुची चिंता तुम्हां असावी चिंता तुम्हा असावी
आम्हां सर्वांची लज्जा देवा तुम्ही रक्षावी ॥७॥

निरोप घेता आता आम्हा आज्ञा असावी देवा आज्ञा असावी
चुकले आमचे काही त्याची क्षमा असावी ॥८॥

Follow us on :
MIRAROADCHA MAHARAJA

Official Website
www.miraroadchamaharaja.com

मिरारोडचा महाराजा

# नमन

घालीन लोटांगण, वंदीनचरण।
डोळ्यांनीपाहीनरुपतुझें।
प्रेमेंआलिंगन, आनंदेपूजिन।
भावेंओवाळीन म्हणेनामा।।१।।

त्वमेवमाताचपितात्वमेव।
त्वमेवबंधुक्ष्च सखात्वमेव।
त्वमेवविध्याद्रविणं त्वमेव।
त्वमेवसर्वंममदेवदेव।।२।।

कायेनवाचामनसेंद्रीयेव्रा, बुद्ध्यात्मनावाप्रकृतिस्वभावात।
करोमियध्यत्सकलंपरस्मे, नारायणायेति समर्पयामि।।३।।

अच्युतंकेशवं रामनारायणं कृष्णदामोदरं वासुदेवं हरिम।
श्रीधरं माधवंगोपिकावल्लभं, जानकीनायकं रामचंद्रभजे।।४।।

हरेरामहरराम, रामरामहरेहरे।
हरेकृष्णहरेकृष्ण, कृष्णकृष्णहरेहरे।

Follow us on :
MIRAROADCHA MAHARAJA

Official Website
www.miraroadchamaharaja.com

मिरारोडचा महाराजा

# प्रार्थना

° सदा सर्वदा योग तूझा घडावा |
तुझे कारणी देह माझा पडावा |
उपेक्षू नको गूणवंता अनंता |
रघूनायका मागणे हेचि आतां ||

°मोरया मोरया मी बाळ तान्हें |
तुझीच सेवा करु काय जाणे ||
अन्याय माझे कोट्यानुकोटी |
मोरेश्वरा ब तू घाल पोटी ||

°कैलास राणा शिव चंद्रमौळी |
फणींद्र माथा मुकुटी झळाळी ||
कारुण्य सिंधू भवदु:खहारी |
तुजवीण शंभो मज कोण तारी ||

°ज्या ज्या ठीकांणी मन जाय माझे |
त्या त्या ठीकांणी निजरुप तुझे ||
मी ठेवितो मस्तक ज्या ठीकांणी |
तेथे तुझे सदगुरु पाय दोन्ही ||

°अलंकापुरी पुण्य भूमी पवित्र |
तिथे नांदतो ग्यानराजा सुपात्र |
तया आठविता महापुण्यराशी|
नमस्कार माझा सदगुरु गयानेश्वराशी ||

Follow us on :
MIRAROADCHA MAHARAJA

Official Website
www.miraroadchamaharaja.com

# मंत्रपुष्पांजली

ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्|
ते हं नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः संति देवाः

ॐ राजाधिराजाय प्रसह्ये साहिने | नमो वयं वैश्रवणाय कुर्महे
स मे कामान्कामकामाय मह्यम्| कामेश्वरो वैश्रवणो ददातु|
कुबेराय वैश्रवणाय | महाराजाय नमः ॐ स्वस्ति
साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं
माहाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्यायी
स्यात्सार्वभौमः सार्वायुष आंतादापरार्धात्पृथिव्यै समुद्रपर्यंता या
एकराळिति
तदप्येष श्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन्गृहे
आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति


Follow us on :
MIRAROADCHA MAHARAJA

Official Website
www.miraroadchamaharaja.com

मिरारोडचा महाराजा

# विविध देवतांचा गायत्री मंत्र

गणेश : ॐ एकदन्ताय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि
तन्नो दन्तीः प्रचोदयात् ।।

शिव: ॐ ॐ तत्पुरूषाय विद्महे महादेवाय धीमहि
तन्नौ रुद्र प्रचोदयात् ।।

विष्णु : ॐ नारायणाय विद्महे वासुदेवाय धीमहि
तनौ विष्णुः प्रचोदयात् ।।

लक्ष्मी : ॐ महालक्ष्मीचं विद्महे विष्णुपत्नी च धीमहि
तन्नो लक्ष्मी प्रचोदयात् ।।

सरस्वती : ॐ सरस्वतबि विद माहे ब्रह्मपुत्रेच धीमही
तन्नोवाणी प्रचोदयात।।

सूर्या : ॐ भास्कराय विद्महे युतिकराय धीमहि
तन्नो सुर्यः प्रचोदयात् ।।

दुर्गा: ॐ कात्यायनायें विद्महे कन्याकुमारी च धीमहि
तन्नो दुर्गेः प्रचोदयात् ।।

गायत्री मंत्र: ॐ भूर्भुवः स्वः ॐ तत्सवितुर्वरेण्यं
भर्गो देवस्य धीमहि धियो यो नः प्रचोदयात्

स्वामी समर्थ: ॐ स्वामी स्वामी समर्थाम् विचमटे
गुरू दत्तात्रये धीमहि | तननो स्वामी प्रचोदयात्

सदगुरू मंत्र : ॐ परब्रह्मणे सिध्मो गुरूदेवाय धीमहि
तन्नो सद्गुरू प्रचोदयात्

Follow us on :
MIRAROADCHA MAHARAJA

Official Website
www.miraroadchamaharaja.com

मिरारोडचा महाराजा

# श्री अष्टविनायक

मोरया मोरया मयुरेश्वरा मोरया ।

मोरया मोरया चिंतामणी मोरया ।

मोरया मोरया सिध्दीविनायक मोरया।

मोरया मोरया महागणपती मोरया।

मोरया मोरया विघ्नेश्वरा मोरया ।

मोरया मोरया गिरीजात्मजः मोरया ।

मोरया मोरया वरदविनायक मोरया ।

मोरया मोरया बल्लाळेश्वर मोरया ।

मोरया मोरया अष्टविनायक मोरया ।

मोरया मोरया गणपती बाप्पा मोरया ।

मोरया मोरया महाराजा मोरया ।

Follow us on :

MIRAROADCHA MAHARAJA

Official Website

www.miraroadchamaharaja.com